महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

क्र.मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉटनं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६३० दिनांक १० / ०८ / २०२१

**विषय:-** महावितरण कंपनीच्या सेवेत नियुक्त झालेले/होणा-या अंध/क्षीणदृष्टी/कर्णबधीर व अस्थिव्यंग कर्मचा-यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करुन देणेबाबत.

**संदर्भ:** १.प्रशासकीय परिपत्रक क्र.७० दि. ०१.०९.२००६
२.प्रशासकीय परिपत्रक क्र.३९३ दि. २८.०२.२०१२

महावितरण कंपनीमध्ये दिव्यांग कर्मचा-यांकरीता महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने, कंपनीचे संदर्भीय प्रशासकीय परिपत्रक क्र.१ अन्वये अपंग कर्मचाऱ्यांकरिता अडथळा विरहीत वावर करण्यासाठी रॅम्पची सोय व संदर्भीय प्रशासकीय परिपत्रक क्र.२ अन्वये अपंग कर्मचाऱ्यांकरिता आधुनिक तंत्रज्ञान व उपकरणे यांचा पुरवठा करणेबाबतच्या सुचना यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. आता, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, निर्णय क्र. दिव्यांग-२०१२/प्र.क्र.३२/दि.क्र.२ दि.०१.०२.२०२१ अन्वये शासकीय/निमशासकीय सेवेत नियुक्त झालेले/होणा-या अंध/क्षीणदृष्टी/कर्णबधीर व अस्थिव्यंग कर्मचा-यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबतच्या सुचना निर्गमित केलेल्या आहेत व सदर उपकरणे याबाबतचा खर्च प्रत्येक प्रशासकीय विभागाने त्यांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधुन भागवावा अशा सूचना दिलेल्या आहेत. तसेच सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे खरेदीबाबतची मर्यादा जास्तीत जास्त **रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष फक्त)** शासनातर्फे विहीत करण्यात आलेली आहे.

३. सबब, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शासन निर्णय दि. ०१.०२.२०२१ ची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये निर्गमित केलेले निर्देश व विहीत कार्यपध्दतीचे अवलोकन करावे व त्याबाबतची अंमलबजावणी करण्यात यावी.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत:** दि. ०१.०२.२०२१ रोजीचा शासन निर्णय.

**(अ.म.भादीकर)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर :**
१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

**प्रत सस्नेह रवाना :**
१) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत रवाना :**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

७) मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

शासकीय/ निमशासकीय सेवेत नियुक्त झालेले/ होणाऱ्या अंध/क्षीणदृष्टी/कर्णबधीर व अस्थिव्यंग कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करुन देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०१२/प्र.क्र.३२/दि.क.२**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दि. ०१.०२.२०२१

**संदर्भ :-**

१. शासन निर्णय क्रमांक-न्यायाप्र-२०११/प्र.क्र.४/सुधार-३, दि.३ जुन, २०११
२. शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०११/प्र.क्र.९१/सुधार-३, दि.२० जुलै, २०११
३. शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/प्र.क्र.३२/अ.क.२, दि.३ मार्च,२०१२
४. शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/प्र.क्र.३२/अ.क.२, दि.६ सप्टेंबर, २०१२
५. शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/प्र.क्र.३२/अ.क.२, दि.२७ डिसेंबर, २०१२
६. शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/प्र.क्र.३२/अ.क.२, दि.१६ मे, २०१३
७. शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/प्र.क्र.३२/अ.क.२, दि.३० डिसेंबर, २०१४
८. शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/प्र.क्र.३२/अ.क.२, दि.०८ जुलै, २०१५
९. शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/प्र.क्र.३२/अ.क.२, दि.१९ नोव्हेंबर, २०१५
१०. शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/प्र.क्र.३२/अ.क.२, दि.०७ ऑक्टोबर, २०१६
११. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क.८२/ भाग-३/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६

**प्रस्तावना:-**

मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेली जनहित याचिका क्र.३२९४/२०१० च्या अनुषंगाने शासकीय /निमशासकीय सेवेतील दिव्यांग कर्मचाऱ्यांना तातडीने विहीत मुदतीत सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणांचा पुरवठा करणे बंधनकारक आसल्याने वित्त विभागाच्या दि.१५.०५.२००९ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या खरेदीच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर दिव्यांग कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबत या विभागाच्या दि.०३ जुन २०११ व दि.२० जुलै, २०११ रोजीच्या शासन निर्णयांन्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. संदर्भाधीन क्र.१० येथिल शासन निर्णयान्वये दि.०३ जुन, २०११ व दि.२० जुलै, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये करावयाच्या खरेदी पध्दतीचा अवलंब करण्याची अट दि.३१.१२.२०१६ पर्यत शिथिल करण्यास मान्यता देण्यात आली होती. तसेच सदर दि.३ जुन, २०११ व दि.२० जुलै, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या पुरवठादाऱ्यांच्या यादीसही दि.३१.१२.२०१६ पर्यत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर प्रकरणी दिव्यांग कर्मचाऱ्यांना सुलभपणे सहाय्यक तंत्रज्ञान उपकरणे उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शासकीय/निमशासकीय सेवेतील दिव्यांग कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबत या विभागाच्या संदर्भाधीन दि.३ जुन, २०११ व दि.२० जुलै, २०११ रोजीच्या शासन निर्णयांतील अटीप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. प्रत्येक प्रशासकीय विभागांने त्यांच्या आस्थापनेवरील दिव्यांग कर्मचाऱ्यांना पुरवावयाचे सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे याबाबतचा खर्च त्यांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधुन भागविण्यात यावा. तसेच संबंधीत आस्थापनेने दिव्यांग कर्मचाऱ्यांना मागणीनुसार संदर्भाधीन क्र.११ येथिल उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांच्या दि.१.०१२.२०१६ नुसार तसेच वित्त विभागाने वेळोवेळी विहित केलेल्या खरेदीपध्दतीचा अवलंब करुन GEMS प्रणालीव्दारे BIS प्रमाणीत केलेली साधने व उपकरणे उपलब्ध करुन द्यावी.

३. उपरोक्त शासन निर्णय दि.३ जुन, २०११ व दि.२० जुलै, २०११ अन्वये संबंधीत कर्मचाऱ्यांस दोन उपकरणांचा पुरवठा करावा. तसेच उपरोक्त संदर्भाधीन दि.०७.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे खरेदीबाबतची मर्यादा जास्तीत जास्त रु.१,००,०००/ (अक्षरी- रुपये एक लक्ष फक्त) विहित करण्यात आली आहे. यासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अर्थसंकल्पात तरतुद करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असुन त्यांचा सांकेतांक क्र. २०२१०२०११५५०४७४३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Anandrao Kamble

Digitally signed by Sunil Anandrao Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4e9b1e99d4d98f0f2a5fda119d3880861fa49114354 0ba0120931ac686b12bc7, cn=Sunil Anandrao Kamble
Date: 2021.02.01 15:55:25 +05'30'

**( सुनिल कांबळे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
५. मा.राज्यमंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
६. मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
७. मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक , मंत्रालय,मुंबई
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय,मुंबई

९. महासंचालक,माहिती व जनसंपर्क, मंत्रालय,मुंबई,
१०.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅक ऑफ इंडिया बिल्डींग, हुतात्मा चौक,मुंबई
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.आयुक्त, दिव्यांग कल्याण, आयुक्तालय, पुणे
१३.आयुक्त, समाज कल्याण, आयुक्तालय, पुणे
१४.आयुक्त, बहुजन कल्याण विकास संचालनालय, पुणे
१५.सर्व जिल्हाधिकारी
१६.आयुक्त, सर्व महानगरपालिका
१७.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषदा
१८. सर्व मुख्याधिकारी,नगरपालिका
१९. सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
२०.कक्ष अधिकारी/आस्था-२, सामाजिक न्याय व विशेष विभाग/विभागातील सर्व कार्यासने
२१.निवड नस्ती दिव्यांग कल्याण-२.